# प्रेस नोट

दि. २६.०५.२०२५

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपी लोकसेवक श्री. हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, वय ३४ वर्ष, पद—कनिष्ठ सहायक, पंचायत समिती चिखली, रा. साखरखेर्डा ता. सिंदखेडराजा, ह.मु. जिजाऊ कॉन्व्हेंटजवळ राऊतवाडी, चिखली** |
| लाच मागणी | २,५००/— रुपये |
| लाच स्विकारली | २,५००/— रुपये |
| घटनास्थळ | पंचायत समिती कार्यालय चिखली |
| घटना तारीख | २६.०५.२०२५ रोजी |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार हयांनी जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे २० टक्के/सेसफंड योजना २०२४—२५ या गट वर्षात मागासवर्गीय शेतकरी/महीला लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर थेट लाभ हस्तांतरण योजनेअंतर्गत शिलाई मशीन मिळणेकरीता पंचायत समिती कार्यालय चिखली येथे अर्ज केला होता. सदरचा अर्ज जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा यांनी अनुदानासाठी मंजुर केला होता. तक्रारदार लाभार्थी हे अनुदानासाठी पात्र ठरल्याने शिलाई मशीन खरेदी केल्याबाबतचे १२,०००/—रू. चे बिल जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा येथे पाठविण्याचा मोबदला म्हणुन लोकसेवक श्री. हेमंतसिंह राजपुत हे २५००/—रू. लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिनांक २६.०५.२०२५ रोजी प्राप्त झाली होती.

त्यावरून दिनांक २६.०५.२०२५ रोजी आयोजीत पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना २५००/—रू. लाचेची मागणी करून स्विकारणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. हेमंतसिंह राजपुत, पद—कनिष्ठ' सहायक, पंचायत समिती चिखली यांनी तक्रारदार यांच्याकडुन गैरलाभ करून घेण्याच्या उददेशाने पंचासमक्ष २५००/—रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यावरून लोकसेवक श्री. हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, वय ३४ वर्ष, पद—कनिष्ठ सहायक, पंचायत समिती चिखली, रा. साखरखेर्डा ता. सिंदखेडराजा, ह.मु. जिजाऊ कॉन्व्हेंटजवळ राऊतवाडी, चिखली यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन चिखली येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती
३.मा. श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री रमेश पवार, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, व सोबत सापळा पथक पोहेकॉ. प्रविण बैरागी, राजेंद्र क्षिरसागर, पोना/जगदीश पवार, पोकॉ. शैलेश सोनवणे, रंजित व्यवहारे, चानापोकॉ/नितीन शेटे, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

(आर.डी. पवार)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्यरो, बुलढाणा

उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय पोलीस ... बुलढाणा

Scanned with OKEN Scanner